**सद्रक्षणाय खलनिग्रहणाय**

**महाराष्ट्र शासन**
**पोलीस विभाग**




थेट दूरध्वनी क्र. :- +९१-२२-२२६२ १२२०
दूरध्वनी केंद्र क्र.:- +९१-२२-२२६२ ०११४
विस्तारित क्र. :- १३८ (पोलीस उप आयुक्त (प्रकटी.)
६२९ (वाचक अधिकारी),
१२१ (स्टेनो), ६२८ (लेखनिक)
ई.मेल :- cp.mum.dcp.det@mahapolice.gov.in

पोलीस उप-आयुक्त(प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, मुंबई यांचे कार्यालय
पोलीस आयुक्त कार्यालयीन आवार
( नवीन इमारत), चौथा मजला,
महात्मा फुले मंडई समोर
डॉ. दा.नौ. मार्ग, मुंबई - ४०० ००१

**क्रमांक पोउआ (प्रकटी)/जा.क्र. ८०९/२०२६** **दिनांक १५/०६/२०२६**

प्रति,

प्रभारी पोलीस निरीक्षक,
पोलीस परिपत्रक कार्यालय,
मुंबई.

विषय :- Best Detection (उत्कृष्ट गुन्हे शोध) व Best Conviction (उत्कृष्ट अपराधसिध्दी) of the Month **May 2026** पोलीस नोटीस व वेबसेल मध्ये प्रसिध्द करणेबाबत.

मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे वतीने मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी, अंमलदारांना बेस्ट डिटेक्शन/बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोध, उत्कृष्ट अपराधसिध्दी याकरीता प्रत्येक महिन्याला निवड करण्यात येते.

**माहे मे -२०२६** करीता **'' बेस्ट डिटेक्शन अर्थात (उत्कृष्ट गुन्हे शोध) तसेच बेस्ट कनव्हिक्शन अर्थात (उत्कृष्ट अपराधसिध्दी)''** याकरीता खालील नमुद पोलीस ठाणे यांची निवड करण्यात आलेली आहे. प्रत्येक महिन्याला सर्वोत्कृष्ट गुन्हयांचा शिफारस अहवाल मा. अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा., पुणे यांना पाठविला जातो. त्याकरीता खालील नमुद **प्रपत्र 'क'** प्रमाणे माहिती भरून सोबत तपासी पथकातील फक्त ०४ नावाची शिफारस करावी. शिफारसपात्र अधिकारी व अंमलदार यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटक प्रमुखांचे प्रमाणपत्र जोडावे. तसेच गुन्हयाशी संबधीत कागपत्र जोडणे आवश्यक आहे. तरी सर्व संबधीतांनी नोंद घ्यावी.

**अ) माहे मे - २०२६ गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न**

१. **शिवाजी नगर पोलीस ठाणे**, पूर्व परिमंडळ ०१, मुंबई गु.र.क्र. ३७६/२६, कलम- १४०(१), १०३(१), २३८, ३(१) भा.न्या.सं.

२. **पवई पो.ठाणे/युनिट १०, गुप्रशा., गुअवि.,** पश्चिम परिमंडळ ०३/प्रकटीकरण ०१, मुंबई. पवई पोलीस ठाणे गु.र.क्र. ५८९/२०२६ कलम १०३(१), ३(५) भा.न्या.स.

**ब) माहे मे - २०२६ सर्वोत्कृष्ट अपराध सिध्दी**

१. **नागपाडा पोलीस ठाणे**, मध्य परिमंडळ ०१, मुंबई गु.र.क्र. ३७२/२०१९ कलम ३७६ भा.दं.वि.

**कृ.मा.पहा.......**

सदर उत्कृष्ट गुन्हे शोध (बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ) व उत्कृष्ट अपराधसिध्दी (बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ) **माहे मे २०२६** बाबतची माहिती सोबत जोडण्यात आली असून सदरची माहिती पोलीस नोटीस व मुंबई पोलीसांचे वेबसेल वर प्रसिध्द करण्यात यावी.

सही/-
पोलीस उप-आयुक्त (प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, गु.अ.वि., मुंबई.

**प्रत**:-

वरिष्ठ पोलीस निरीक्षक- वेबसेल, पोलीस आयुक्त कार्यालयाचे आवार, मुंबई.

**मजकुर :-**

दिनांक १०/०६/२०२६ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **"Best Detection of the Month"** माहे **मे २०२६** या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ एप्रिल २०२६ - ०२ गुन्हे

| | | |
|---|---|---|
| ०१ | **शिवाजीनगर पोलीस ठाणे**<br>पूर्व परि - ०१, मुंबई. | गु.र.क्र. ३७६/२६, कलम- १४०(१), १०३(१), २३८, ३(१) भा.न्या.सं |

**-: " अपहरण करून खुन " :-**

नमुद गुन्हयात फिर्यादीचा मयत भाऊ औरंगजेब हा राहत असलेल्या परिसरातुन फिर्यादीच्या मामाचा मुलगा नामे आबेश याने त्याची बहीन व फिर्यादीचा भाऊ वसीम याची पत्नी सिम्मी हीचे सोबत औरंगजेब याचे अनैतीक संबध असल्याचा संशय घेवुन औरंगजेब यास जिवे ठार मारण्याचे उदेशाने अपहरण करून खून केला म्हणून गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :- | मुसब्बीर समीरूद्दीन शेख, मु. वय ३७ |
| बळीत मयत | :- | औरंगजेब समीरूद्दीन शेख,मु.वय २७ |
| आरोपी अटक व दिनांक | :- | १) आबेश कर्णी मुस्तफा शेख वय ३२ वर्षे<br>**(अटक दि ०९/०५/२०२६**<br>२) फैय्याज उर्फ फरयाद मोह.अल्ताफ शेख वय ३४<br>अटक दिनांक **११/०५/२०२६** |

- तपास- नमुद गुन्हयातील फिर्यादी नामे मिर्झा जावेद कलीम बेग, वय ४३ वर्षे यांनी तक्रार दिल्याने शिवाजी नगर पोलीस ठाणे हरवलेली व्यक्ती नोंद क्र.८८/२०२६ अन्वये दि.०५/०५/२०२६ रोजी नोंद करून तपास सुरू केला. सदर तपासामध्ये हरवलेल्या व्यक्तीचा शोध दरम्यान हरवलेल्या व्यक्तीचा शोध घेणेकामी हरवलेला व्यक्ती शेवटी कोणासोबत दिसुन आला याबाबत त्यांचे ओळखीचे मित्र, नातेवाईक यांचेकडे माहीती घेतली असता हरवलेला व्यक्ती औरंगजेब हा त्याचा वहीनीचा भाउ आबेश कर्णी याचेसोबत असल्याचे निष्पन्न झाले. हरवलेला इसम औरंगजेब व संशयित इसम आबेश कर्णी यांचे मोबाईल बंद असल्याचे व आबेश कर्णी याने एक दिवसापुर्वी हरवलेला इसम औरंगजेब याला मारण्याची धमकी दिली असल्याचे निष्पन्न झाले. यावरून संशयित इसम नामे आबेश कर्णी याचे घर बंद मिळुन आले व सदर घराची बारकाईने पाहणी केली असता त्यामध्ये रक्तसदृश्य डाग भिंतीवर, टेबलाचे फर्निचर वर दिसुन आले. त्यामुळे हरवलेला इसम औरंगजेब व संशयित इसम आबेश कर्णी याचा शोध सुरू केला. त्यानंतर आबेश कर्णी याचे नातेवाईक यांचेकडे फोनद्वारे माहीती घेतली असता आबेश कर्णी याचा बहीण सिम्मी व हरवलेला इसम नामे औरंगजेब यांचे प्रेमसंबंध असल्याचे माहीती समजली.तसेच संशयित इसम नामे आबेश कर्णी याने औरंगजेब याला मारल्याचे त्याचा भाउ वसीम याला फोनद्वारे सांगितले. त्यामुळे आबेश कर्णी याने हरवलेला इसम नामे औरंगजेब याचा खुन करण्याचे उद्देशाने अपनयन केले असल्याचे तपासामध्ये निष्पन्न झाल्याने फिर्यादी नामे मिर्झा जावेद कलीम बेग यांचे तक्रारीवरुन शिवाजी नगर पोलीस ठाणे गु. रजि. क्र.३७६/२०२६ कलम १४०(१),१०३(१),३(५) भा.न्या.सं.अन्वये गुन्हा दाखल
- सदर गुन्हयाचे तपासामध्ये आबेश कर्णी हा त्याचा मोबाईल बंद करून दि. ०५/०५/२०२६ रोजी पासुन फरार असल्याने त्याचा शोध घेणेकामी त्याचे मोबाईल नं, आएमईआय नं चे तांत्रिक विश्लषण केले असता ते बंद होते. त्यामुळे त्याचे ओळखीचे इसमांचा ठाणे, काल्हेर भिवंडी या ठिकाणी शोध घेवुन त्यांचेकडे तपास करून आबेश कर्णी याचा नवीन नंबर प्राप्त केला.
- सदर आरोपी नामे आबेश कर्णी याचा नवीन मोबाईल नंबर चे लोकेशन चे आधारे कल्याण, ठाणे या ठिकाणी शोध घेतला असता तो मिळुन आला नाही. आरोपी आबेश कर्णी हा त्याचा नवीन नंबर बंद चालु करीत होता. तसेच सदर आरोपी याने कल्याण रेल्वे स्टेशन वरून रेल्वेने कोलकत्ता कडे गेला असल्याचा अंदाज आल्याने त्यामुळे सपोनि सुरज निंबाळकर व पथक पोशि/दुर्गेश राणे, पोशि/राहुल सुळके, पोशि/ हणमंत दोलताडे यांना आरोपी शोध कामी रवाना केले. त्यानंतर आरोपी आबेश कर्णी याचे मोबाईल रायपुर या ठिकाणी मिळुन आल्याने त्याचा मुंबई-कोलकत्ता या चालत्या ट्रेन मध्ये रायपुर रेल्वे पोलीसांची मदत घेवुन आरोपी आबेश कर्णी हा मिळुन आला. त्याचा ट्रॅन्झिस्ट रिमांड घेवून पोलीस ठाण्यास आणले.
- सदर आरोपी आबेश कर्णी याचे कडे तपास केला असता सदर हरवलेला इसम नामे औरंगजेब याचे आरोपीची बहीण सिम्मी सोबत अनैतिक संबंध असल्याचे समजल्याने त्याने औरंगजेब याचा खुन करून त्याचे शरीराचे तुकडे करून पुरावा नष्ट करण्याच्या उददेशाने शिवाजीनगर परिसरातील ९० फिट लगतच्या नाल्यामध्ये, घाटकोपर येथील अदानी

बिल्डींगच्या समोरील नाल्यामध्ये, तसेच त्या लगतच्या फॉरेस्ट मध्ये असे वेगवेगळया ठिकाणी टाकले असल्याचे सांगितले.

- पाहिजे आरोपी आबेश याने अपनयन केले असे फिर्यादी यांनी सांगितले असल्याने त्याचे पुर्ण नाव आबेश कर्णी मुस्तफा शेख रा. प्लॉट नं ३४, रोड नं ०५, शिवाजी नगर, गोवंडी, मुंबई मो नं. ९९३२६७१७६४ असे निष्पन्न झाले आहे. सदर आरोपीत आबेश हा शेवटी त्याचे कारखान्यातील मुली नामे रेशमा व एक अनोळखी महीलेला एलटीटी रेल्वे स्टेशन वर सोडण्याकरीता गेला असल्याचे प्राथमिक तपासामध्ये निष्पन्न झाले आहे. सदर गुन्हयातील आबेश व त्याचा नातलग फैय्याज हे दोघे शेवटी सोबत असल्याचे प्राथमिक तपासामध्ये तपास पथकाला निष्पन्न झाले आहे.
- सदर गुन्हयातील आरोपी व मयत तसेच त्याचे नातलग असे एकुण आबेश, फैय्याज, वसीम, सिम्मी यांचे मोबाईल नंबर प्राप्त करून ते गुन्हयाचे तपासकामी सीडीआर करीता सायबर विभाग झोन-६ यांना पाठविण्यात आले.
- मोबाईल क्रमांक व आएमईआय नंबरचे तांत्रिक विश्लेषण करून त्याचा दुसरा मो नं प्राप्त करण्यात आला होता त्यावरुन त्याने नवीन मो नं घेतला असल्याचे तपासामध्ये निष्पन्न झाले आहे. सदर नवीन मो नं चे लोकशन सायबर विभागामार्फत प्राप्त केले असता सदर आरोपीत याचे लोकेशन रायपुर या ठिकाणी असल्याचे दिसुन आले व सदर लोकेशन हे रेल्वे पटरी वरील असल्याचे दिसुन आले. तरी सदर आरोपी आबेश हा हावरा एक्प्रेस या ट्रेन मधुन जात असल्याचा अंदाज असल्याने सपोनि सुरज निंबाळकर पथक व जीआरपी रायपुर पोलीस ठाणे यांचे मदतीने हावरा एक्प्रेस मध्ये आबेशचा शोध घेतला व तो मिळुन आला आहे.
- सदर गुन्हयातील अपनयन झालेला इसम नामे औरंगजेब व आबेश कर्णी याची बहीण सिम्मी यांचे अफेअर असल्याचे त्याला माहीती झाले होते. सदर बाब आरोपी आबेश ला दोन दिवसापुर्वी समजली होती. त्यामुळे दि. ०४/०५/२०२६ रोजी आरोपी आबेश याने दारू पाजुन घरातील कुकरने औरंगजेब याचे डोक्यात कुकर घातला व त्याचा खुन केला. त्यानंतर त्याचे शरीराचे भाग करून मुंबई मधील विविध भागात टाकले असल्याचे सांगितले. सदर गुन्हयात वापरलेले हत्यार मुख्य आरोपीताकडून हस्तगत करण्यात आले आहे.
- गुन्हयातील मुख्य आरोपी व सहआरोपी याचे निवेदन पंचनाम्यातंर्गत मयत इसमाचे शीर गोदरेज कॉलनी, विक्रोळी ईस्टर्न एक्सप्रेस हायवे च्या बाजुला असलेला एका घनदाट जंगलात टाकून दिले होते. त्या शीर चा त्या परिसरात सर्वत्र शोध घेवून ताब्यात घेण्यात आले. तसेच शिवाजीनगर परिसरात रोड नं.५ नाईटी फीट रोडलगत असलेल्या नाल्यामध्ये मयत इसमाचे उजवा हात व धड टाकून दिले होते. ते ताब्यात घेण्यात आले.
- मयत इसमाचा डावा हात व दोन्ही पाय हे रमाबाई कॉलनी येथील नाल्यामध्ये टाकून दिले होते. ते सर्वोत्तपरी प्रयत्न करून सुध्दा मिळुन आले नाही. आरोपीताने सदर नाल्याजवळ आरापीताने मयत इसमाचे डावा हात व दोन्ही पाय ज्या गोणीमध्ये भरून नाल्य कटटयावर ठेवून ती गोणी नाल्यामध्ये टाकून दिले होते. त्या कटयावर रक्तसदृश डाग दिसुन आल्याने ते गुन्हयाच्या तपासकामी ताब्यात घेवून परिक्षणाकरीता कलीना येथे पाठविण्यात आले आहे.
- तसेच सदर गुन्हयातील आरोपी आबेश याने मयत औरंगजेब याचाा खुन करून मयताचे शरीराचे तुकडे करून ते वेगवेगळया भागात टाकण्याकरीता आरोपी आबेश चा मित्र फैय्याज याचे मदतीने वेगवेगळया भागात टाकले आहेत. त्यामुळे फैय्याज याचा आरोपी म्हणुन गुन्हयातील सहभाग निष्पन्न झाले. त्यानंतर फर्याद हा त्याचा मोबाईल बंद करून दि.०६/०५/२०२६ रोजी पासुन फरार असल्याने त्याचा शोध घेणेकामी त्याचे मोबाईल नं, आएमईआय नं चे तांत्रिक विशलषण केले असता ते बंद येत असल्याने तो त्याच्या राहत्या गावी त्याच्या नातेवाईकांकडे गेले असल्याची माहीती प्राप्त झाल्याने त्याला ताब्यात घेणेकरीता त्याचा शोध बिहार व पं बंगाल या ठिकाणी घेणेकरीता सपोनि भारत जाधव व पथक हे घेत आहेत.
- दिनांक १०/०५/२०२६ रोजी सदर गुन्हयात आरोपी नामे फर्याद मोहम्मद अल्ताब हुसैन,यास राज्य बिहार येथुन शिताफीने ताब्यात घेण्यात आले त्या आरोपीताचे ट्रान्झिस्ट रिमांड घेवून त्यास सपोनि भारत जाधव व पथक यांनी दिनांक ११/०५/२०२६ रोजी शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे हजर केले.

नमूद गुन्हयाच्या तपासामध्ये आरोपीताने पुरावा नाहीसे करण्यासाठी वेगवेगळया दुकानातून ग्लोज एअर फ्रेशनर, मोठया कॅरीबॅग्ज खरेदी केले होते ते सीसीटीव्ही फुटेज गुन्हयाच्या तपासकामी ताब्यात घेण्यात आले आहे.

**<u>शिवाजी नगर पोलीस ठाणे</u> तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/अंमलदार नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | सहा. पोलीस निरीक्षक | भारत लव जाधव | प्रशस्तीपत्रक |
| २ | सहा. पोलीस निरीक्षक | सूरज मदन निंबाळकर | प्रशस्तीपत्रक |
| ३ | पोलीस उप निरीक्षक | अजय जगन्नाथ गोल्हार | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पो.ह. ०८०१३६ | प्रदीप धोंडीराम फसाले | प्रशस्तीपत्रक |
| ५ | पो.शि. १४०२६५ | हणमंत लक्ष्मण दोलताडे | प्रशस्तीपत्रक |

| | | |
|---|---|---|
| ०२ | **पवई पो ठाणे/युनिट १०**<br>पश्चिम परि ०३/<br>प्रकटीकरण ०१, मुंबई. | **पवई पो.ठाणे गु.र.क्र.** ५८९/२०२६ कलम १०३(१), ३(५) भान्यास. |

**-: '' धारदार शस्त्राने भोकसुन खुन '' :-**

यातील मयत इसम हा गुन्हयाचे घटनास्थळी रिक्षामध्ये झोपला होता. अटक आरोपीतांनी सदर ठिकाणी येवून रिक्षात झोपलेला इसम हा त्याच्याशी पुर्वी वाद झालेला रिक्षा चालक आहे असे समजुन मयतावर धारधार शस्त्राने वार करून त्याचा खून केला म्हणुन गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :- | श्री. विजय अरूण घाडगे, वय ३८ (पो.शि.क्र. ११३००६) |
| बळीत | :- | युसुफ, (संपुर्ण नाव माहिती नाही) **मयत** |
| आरोपी अटक व दिनांक | :- | १) दिपक नत्थुप्रसाद वर्मा, वय २६ (युनिट १० कडून अटक)<br>२) प्रमोद रामकृपाल वर्मा, वय २४ (पवई पो.ठाणेकडून अटक)<br>**अटक दिनांक :-२७/०५/२०२६** |

**<u>पवई पो.ठाणे तपास</u>-** सदर गुन्हा हा गंभीर स्वरूपाचा असल्याने मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १०, मुंबई यांनी पवई पोलीस ठाणे व पश्चिम परिमंडळ ०३ मधील इतर पोलीस ठाण्याचे मिळुन वेगवेगळी ०८ पथके तयार केली. सदर पथकांनी गुन्हयाचे परीसरात तुंगा गाव येथे चौकशी करून मयत इसमाचे नाव युसुफ, रा.ठि मनुभाई चाळ, मुंबई (संपुर्ण नाव माहिती नाही) असे असल्याचे निष्पन्न केले. मयत इसमाचे कुटुंबिय मिळुन येत नसल्याने तसेच मयत इसम हा फुटपाथवर राहत असल्याने त्याचे खुनाचा निश्चित उद्देश समजुन येत नव्हता. तपास पथकाने मानवी कौशल्याचा वापर करून स्थानिक परिसरात नागरीकांकडे चौकशी केली. २५ ते ३० संशयितांकडे तपास केला. घटनास्थळ व परीसरातील १०० ते ११० सी.सी.टी.व्ही कॅमेरे तपासले. त्याच बरोबर तांत्रीक तपास करून सदर गुन्हयात प्रथम दर्शनी दोन इसमांचा सहभाग असल्याचे निष्पन्न केले. सदर आरोपी हे गुन्हा करून परराज्यात गेले असल्याने मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तात्काळ दोन पथके रवाना करण्यात आली. बळीत इसमावर वार करून त्याचा खुन करणारा मुख्य आरोपीने पेहराव बदलुन तसेच केस कापुन ओळख लपवण्याचा प्रयत्न केला असताना देखील तपास पथकाने आरोपी नामे प्रमोद राम कृपाल वर्मा, वय २४ वर्षे, धंदा मजुरी रा.ठी - वार्ड नंबर चार सुदामपुरी, पोलीस ठाणे अतारा, जिल्हा बांदा, राज्य उत्तर प्रदेश. येथुन शिताफिने ताब्यात घेवुन पवई पोलीस ठाणेस आणले.

अटकेची खबर आरोपीताची बहिन नामे ज्योती वर्मा यांना फोनद्धारे देण्यात आली आहे. त्याचप्रमामे अटक कालावधी मध्ये आरोपी कडे केलेल्या तपासात त्याने सदर अटक आरोपी याने जुन्या भांडणाचा राग मनात धरून त्याचा साथीदार नामे दिपक उर्फ दिपु नथुप्रसाद वर्मा, वय २६ वर्षे याच्यासह मिळून सदर खुन केल्याचे सांगितले असुन अधिक तपास चालु आहे.

नमुद गुन्हयात १) निवेदन पंचनामा २) घटनास्थळ पंचनामा ३) सादर पंचनामा ४) अंगझडती पंचनाम करून गुन्हयात वापरण्यात आलेला चाकु, गुन्हा करताना आरोपीताने परिधान केलेले रक्ताने माखलेले कपडे, मयत झोपलेला ॲटो रिक्षा जप्त करण्यात आले आहेत.

सदर मयत इसम युसुफ, रा.ठि मनुभाई चाळ, मुंबई (संपुर्ण नाव माहिती नाही) पाहिजे आरोपीताने नमुद मयतास मारण्याचे कारण माहित नसताना पवई पोलीस ठाणेचे नमुद पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी कार्य तत्परतेने, सखोल व कौशल्यपूर्ण तपास करून यातील मयत इसम युसूफ याच्या खुनाचा उलगडा करून गुन्ह्यातील आरोपी नामे १) प्रमोद राम कृपाल वर्मा, वय २४ वर्षे, धंदा मजुरी रा.ठी - वार्ड नंबर चार सुदामपुरी, पोलीस ठाणे अतारा, जिल्हा बांदा, राज्य उत्तर प्रदेश. २) दिपक नत्थुप्रसाद वर्मा, वय २६ वर्षे, राठी-शिवमशाळे जवळ, तुंगा गांव, पवई, कायमचा पत्ता-लौली टिका मउ, ता-बबेरू, जि-बांदा, राज्य-उत्तर प्रदेश यास ताब्यात घेऊन सदर पवई पोलीस ठाणे, गु.र.क्र. ५८९/२६, कलम १०३(१), ३(५) भा.न्या.सं अन्वये नोंद गुन्हा उघडकीस आणलेला आहे.

**<u>युनिट १०, गुप्रशा.,गुअवि., तपास:-</u>** घटनास्थळाचे आजूबाजूचे एकूण १०० पेक्षा जास्त सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केल्यावर आरोपी घटनास्थळावर आलेल्या व परत गेलेल्या मार्गावरील टॉवर डम्प आणि जीपीएस डम्प प्राप्त केला. त्याचे सखोल तांत्रिक विश्लेषण केले असता त्यातील एक संशयित मो.क्र९९६७५६७९२९ प्राप्त करून त्याचे CDR मधील टॉवर लोकेशनची वेळ व आरोपी CCTV फुटेजमध्ये दिसत असलेली वेळ यात सामाईकपणा दिसून आला. सदर संशयित मो.क्र. CDR चे सखोल विश्लेषण करून मोस्ट कॉलर इसम नामे साहिल खान राठी- फिल्टर पाडा पवई याचा शोध घेउन त्याचेकडे चौकशी केली असता त्याने फोटोमधील दोन्हीही आरोपीतांना ओळखले. त्यापैकी एक आरोपी नामे दीपक वर्मा उर्फ दीपू हा सुरत गुजरात येथे असल्याचे

सांगितलेने तात्काळ पोलीस पथकास सुरत येथे रवाना करून एक आरोपी नामे दीपक वर्मा उर्फ दीपू यास ताब्यात घेउन **७२ तासाच्या आत** गुन्हा उघडकीस आणला.

**पवई पोलीस ठाणे/युनिट १०, गुप्रशा., गुअवि तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/अंमलदार नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक | सुशांत सोपान बंडगर | प्रशस्तीपत्रक |
| २ | सहा. पोलीस निरीक्षक | सुहास भास्कर कादे (साकीनाका पोलीस ठाणे) | प्रशस्तीपत्रक |
| ३ | पोलीस उप निरीक्षक | राकेश शंकर नलावडे | प्रशस्तीपत्रक |
| ४ | सहा. पोलीस निरीक्षक | गणेश शिवाजी तोडकर (युनिट १०) | प्रशस्तीपत्रक |
| ५ | पो.ह. ९७०५३३ | संतोष शिवाजी धनवडे (युनिट १०) | प्रशस्तीपत्रक |
| ६ | पोलीस निरीक्षक | विशाल सुभाष राजे (युनिट १०) | प्रशस्तीपत्रक |

**मजकुर :-**

दिनांक १०/०६/२०२६ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **“Best Conviction of the Month”** माहे **मे २०२६** या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेची निवड करण्यात आलेली आहे.

## (ब) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ मे २०२६ - ०१ गुन्हा

| | | |
|---|---|---|
| ०१ | **नागपाडा पो.ठाणे**<br>मध्य, परिमंडळ ०१, मुंबई. | **गु.र.क्र. व कलम**:- ३७२/२०१९,कलम ३७६ भा.दं.वि |

**-: “ बलात्कार ” :-**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत :-** नमुद गुन्हयांत आरोपीताने फिर्यादी यांच्या असहाय्य परिस्थितीचा फायदा घेवुन तसेच फिर्यादी यांच्या राहण्याची व जेवणाची व्यवस्था करतो असे सांगुन त्यांच्याशी जवळीक करून फिर्यादी यांच्या इच्छेविरूध्द संभोग केला म्हणुन गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | :- | कुमारी अवनित कौर मोहिंदर सिंग,वय १८ |
| **निकाल दिनांक** | :- | **३०/०४/२०२६** |
| **बळीत मयत** | :- | फिर्यार्दी |
| **अटक आरोपी व अटक दिनांक** | :- | अक्रम इब्राहिम कुरेशी वय ४५ वर्षे<br>**अटक दिनांक:-** ०९/११/२०१९ |
| **दोषसिध्दीचा तपशील** | :- | नमुद गुन्हयात श्री. एन.एस कऱ्हाळे, मा. सत्र न्यायालय, कोर्ट क्र.३४, मुंबई यांनी **दि. ३०/०४/२०२६** रोजी गुन्हयातील आरोपी यास दोषी ठरवून **१० वर्षे सश्रम कारावास व ५०००/- रु दंड, दंड न भरल्यास १ महिना साधी कैद** ही सजा सुनावण्यात आली. |

**तपास कौशल्य** :- **राज्य लुधीयाना येथुन फिर्यादी यांची साक्ष व्यवस्था करून घेतली बाबत.** यातील फिर्यादी महिला या सद्या लग्न होवून सासरी पंजाब येथे राहवयास आहेत. नमुद घडलेल्या घटनेची महिती सासरी होवू नये या करीता ते साक्ष कामी येण्यास असमर्थ दाखवित होत्या. तपासी पथकाने फिर्यादी महिलेस संपर्क करून सदरचा प्रकार हा सासरी माहिती होणार नाही याची दक्षता घेवून त्यांच्या राज्यातील इतर कोणत्याही न्यायालयात व्हि.सी व्दारे साक्ष देता येईल असे सांगितले. ते तिला पटल्याने फिर्यादी व्हि.सी व्दारे साक्ष देण्यास तयार झाली तेव्हा फिर्यादी यांच्या सोईने मा. न्यायालयाकडून तिच्या साक्षीची तारीख मिळविण्यात आली आणि पैरवी अधिकारी मपोशि क्र. ०९१२९७/दामीनी दाभाडे यांना सदर महिलेच्या राहते गावी पंजाब येथे कागदपत्रांसह पाठविण्यात आले. मपोशि दामीनी दाभाडे यांनी फिर्यादी महिलेचीच्या बाबतीत घडलेली घटना तिच्या सासरी माहिती होणार नाही याची दक्षता घेवून तिची साक्षची व्यवस्था लुधीयाना येथील मा.न्यायालयात रितसर करुन घेतली. त्याप्रमाणे ठरलेल्या तारखेला सदर फिर्यादी महिलेस पैरवी अधिकारी यांचे मार्फेतिने केस चे कागदपत्राचे योग्य ते ब्रिफिंग करून मा. लुधीयाना कोर्ट येथील व्हि सी व्दारे मुंबईतील मा. न्यायालयातील साक्ष पुर्ण करून घेतली.

तपासी पथकातील तसेच न्यायालयीन कामकाज करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी आरोपीस दोषसिध्दी प्राप्त करण्याकरीता उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

**नागपाडा पोलीस ठाणे तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/अंमलदार नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | सहा. पोलीस निरीक्षक | गिता कुंदन सोळंकी (पायधुनी पो.ठा) | प्रशस्तीपत्रक |
| २ | मपोशि.०९१२९७ | दामीनी देविदास दाभाडे | प्रशस्तीपत्रक |
| ३ | पो.शि.११२९२६ | योगेश गणपत दिवाने | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पो.शि. ११३७२० | श्रीकांत गंगाराम गायकवाड | प्रशस्तीपत्रक |
| ५ | पो.शि. १४०३८३ | निशांत विलास पवार | प्रशस्तीपत्रक |

**टिप:-** वरिष्ठ/प्रभारी पोलीस निरीक्षक, **शिवाजी नगर पोलीस ठाणे** व **पवई पोलीस ठाणे/युनिट १०, गुप्रशा. गुअवि (संयुक्त)** यांना "Best Detection of the Month **May 2026**" तसेच **नागपाडा पोलीस ठाणे**, मुंबई यांना "Best Conviction of the Month **May 2026**" या करीता निवड झाली असून, कळविण्यात येते की राज्य स्तरावर गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न (Best Detection of the Month) व सर्वोत्कृष्ट अपराध सिध्दी (Best Conviction of the Month) करीता प्रत्येक महिन्याला सर्वोत्कृष्ट गुन्हयांचा शिफारस अहवाल मा. अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा., पुणे यांना पाठविला जातो. त्याकरीता खालील नमुद **प्रपत्र 'क'** प्रमाणे माहिती भरुन सोबत तपासी पथकातील फक्त ०४ जणांच्या नावाची शिफारस करावी. शिफारसपात्र अधिकारी व अंमलदार यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटक प्रमुखांचे प्रमाणपत्र जोडावे. तसेच गुन्हयाशी संबधीत कागपत्र जोडणे आवश्यक आहे.

# Best Detection of the Month

## ‘प्रपत्र ‘क’

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे/गु.र.क्र. | |
| ०२ | फिर्यादीचे नाव, पत्ता | |
| ०३ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०४ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०५ | गुन्हा उघड दिनांक | |
| ०६ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, न्यायालय, कोर्ट केस क्रमांक | |
| ०७ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०८ | **Property offence** बाबतीत<br>**a)** गेलेला माल<br>**b)** जप्त/हस्तगत केलेला मालं | |
| ०९ | मयत/पिडीत व्यक्तीची माहिती | |
| १० | आरोपी मृतक/पिडीत नाते | |
| ११ | गुन्हयात तपासलेले प्रत्यक्ष साक्षीदार व त्यांचे पुरावा योग्य जबाब थोडक्यात | |
| १२ | घटनास्थळ पंचनामा वरून प्राप्त पुरावे<br>**a)** घटनास्थळ फोटो / छायाचित्रण केले आहे का? | |
| १३ | **Inquest** पंचनामा माहिती | |
| १४ | शवविच्छेदन अहवाल माहिती | |
| १५ | गुन्हयात वापरेले शस्त्र/जखमा याबाबत वैदयकीय अभिप्राय | |
| १६ | **DNA** टेस्ट केली असल्यास न्यायवैद्यक प्रयोग शाळेचे अहवाल | |
| १७ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १८ | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १९ | पाहिजे /फरारी आरोपी नाव, वय, पत्ता | |
| २० | **CDR/SDR/C.C.T.V/Electronic Evidence** बाबत माहिती भा.पु.का.क. ६५(ब) प्रमाणे प्रमाणपत्र हस्तगत केले आहे का ? | |
| २१ | **Cyber Expert** ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २२ | **FORENSIC Expert** ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २३ | **Dog Squad** ची मदत घेतली का ? कशप्रमाणे | |
| २४ | **Fingerprint / Handwriting Expert** ची मदत घेतली का | |
| २५ | आरोपी **Portrait** बाबत **Expert** ची मदत घेतली का ? | |
| २६ | आरोपीचे गुन्हेगारी रेकॉर्ड तपासून निष्पन्न झालेली माहिती | |
| २७ | गुन्हयात कोणती टोळी (गॅंग) निष्पन्न झाली आहे का ? असल्यास माहिती | |
| २८ | आरोपीची ओळख परेड कार्यकारी दंडाधिकारी समोर घेतली आहे का ? | |
| २९ | जप्त मालाची आळख कार्यकारी दंडाधिकारी समोर करून घेतली का ? | |
| ३० | गुन्हा उघडकीस आणण्यासाठी व आरोपी अटकेसाठी केलेल प्रयत्न थोडक्यात | |
| ३१ | आरोपी अटकेसाठी कलेले प्रयत्न थोडक्यात | |
| ३२ | गेपनिय माहिती कशा प्रकारे प्राप्त केली | |
| ३३ | गुप्तवार्ता संकलनामध्ये खाजगी व्यक्तीची मदत झोतली का? | |
| ३४ | गुप्त बातमीदार पोलीसांनी स्वत: नेमले होते का ? | |
| ३५ | गुन्हा उघडकीस आणण्याकरीता योगदान देणारे अधिकारी/पोलीस अंमलदार | |

१) F.I.R प्रत सर्व पंचनाम्याच्या प्रती, महत्वाचे साक्षिदरांचे जबाब, शवविच्छेदन अहवाल, ओळखपरेड कागदपत्रे, वैदकीय अधिकारी यांचे शस्त्र व जखमांबाबत अभिप्राय, आरोपी पुर्वीचे गुन्हेगारी **Record,** दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केलेली प्रत, Inquest पंचनामा, घटनास्थळ पंचनामा, भा.पु.का., कलम २७ प्रमाणे जप्ती पंचनामा, इत्यादी कागपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

२) गुन्हयाचे दोषारोपपत्र ज्या महिन्यात दाखल करण्यात आले आहे त्याच महिन्याचे गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा. सदर प्रस्ताव दोषारोपपत्र दाखल केलेल्या दिनांका पासून पुढील महिन्याच्या ३० तारखेपर्यंतच पाठविण्यात यावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा बक्षिसाकरीता विचार करण्यात येणार नाही.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

# Best Conviction of the Month

## 'प्रपत्र 'क'

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे/गु.र.क्र. | |
| ०२ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०३ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०४ | गुन्हा उघड दिनांक | |
| ०५ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०६ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, न्यायालय, कोर्ट केस क्रमांक | |
| ०७ | गुन्हयाचा निकाल दिनांक | |
| ०८ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| ०९ | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १० | फरार आरोपी अटक, सी.आर.पी.सी., कलम ८२,८३ नुसार कार्यवाही केली आहे का ? | |
| ११ | प्रत्येक आरोपीला झालेली शिक्षा | |
| १२ | न्यायालयाने ज्या पुरावा साखळीचे आधारे शिखा दिली त्याबाबतची सविस्तर माहिती.<br>**A)** साक्षीदारांचे न्यायालयासमोर जबाब<br>**B)** पंचांचें न्यायालयासमोर जबाब<br>**C)** परिस्थितीजन्य पुरावा साखळी<br>**D)** तज्ञ व्यक्तीचे जबाब<br>**E)** वैज्ञानिक /तांत्रिक पुरावे<br>**F)** तपासी अंमलदार यांचे जबाब<br>**G)** पैरवी अधिकारी नाव व कामगिरी<br>**H)** सरकारी वकील नाव व कामगिरी | |
| १३ | तपास व अपराधसिध्दी करीता यांगदान देणारे पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार यांची नावे | |

१) मा.न्यायालयाचे निकालपत्र प्रस्तावासोबत जोडण्यात यावे.

२) गुन्हयाचे निकाल ज्या महिन्यामध्ये देण्यात आललो आहे त्याच महिन्याचे सर्वोत्कृष्ट अपराधसिध्दी बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा. सदर प्रस्ताव निकाल लागलेल्या दिनांका पासून पुढील महिन्याच्या ३० तारखेपर्यंतच पाठविण्यात यावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा बक्षिसाकरीता विचार करण्यात येणार नाही.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

# Best Recovery of the Month

## ‘प्रपत्र ‘ क ’

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे/गु.र.क्र. | |
| ०२ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०३ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०४ | गुन्हा उघड दिनांक | |
| ०५ | गेलेला माल | |
| ०६ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०७ | गुन्हा उघडकीस आणणारे अधिकारी, अंमलदार | |
| ०८ | गुन्हा उघडकीस आला तारीख | |
| ०९ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १० | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| ११ | पाहिजे /फरारी आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १२ | भा.द.वि. कलम ४११ ते ४१४ प्रमाणे कारवाई केली आहे का? | |
| १३ | मोका अंर्तगत कारवाई केली असल्यास आरोपीची मालमत्ता जप्ती प्रक्रियेबाबत केलेल्या कारवाईचे विवरण | |
| १४ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, केस क्रमांक, न्यायालय | |
| १५ | गुन्हा उघडकीस आणण्यासाठी केलेल प्रयत्न.<br>a) घटनास्थळावरून प्राप्त पुरावे ( घटनास्थळ पंचनामा जोडावा)<br>b) तपासलेले साक्षीदार संख्या<br>c) गुन्हा उघडकीस आणण्यासाठी सांक्षीदारांची कशी मदत झाली<br>d) Dog Squad ph enr<br>e) Fingerprint / Handwriting Expert ph enr<br>f) Cyber Expert ph enr<br>g) FORENSIC Expert ph enr<br>h) CDR/SDR/C.C.T.V/Electronic Evidence माहिती<br>i) गुन्हेगारां संदर्भातील रेकॉर्ड /हिस्ट्रीशीट KCR इतर तपासले असल्यास त्या संदर्भातील इतर गुन्हयांची माहिती<br>J) गुप्त बातमीदार /गोपनिय माहिती कशा प्रकारे प्राप्त केली<br>k) परत मिळालेल्या मालाची कार्यकारी दंडाधिकारी समोर ओळख पटवली आहे का ?<br>l) मौल्यवान मालाचे मुलयांकन करून घेतले आहे का ? | |
| १६ | तपासाकरीता योगदान देणारे पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार यांची नावे | |

१) दोषारोपपत्र मा. न्यायालयात दाखल केल्याची प्रत प्रस्तावासोबत जोडण्यात यावी.

२) गुन्हयाचे दोषारोपपत्र ज्या महिन्यात दाखल करण्यात आले आहे त्याच महिन्याचे सर्वोत्कृष्ट मालमत्ता हस्तगत बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा. सदर प्रस्ताव दोषारोपपत्र दाखल केलेल्या दिनांका पासून पुढील महिन्याच्या ३० तारखेपर्यंतच पाठविण्यात यावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा बक्षिसाकरीता विचार करण्यात येणार नाही.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

# INTEGRITY CERTIFICATE

Certified that the integrity of Mr/Mrs ………………………………., Designation- …………………., Recommended for the award of **" Excellence in Investigation"** for the Month of ……..Year 2025 is above suspicion and that he / she was not concerned in any proceeding that was censured in a court of law. It is further certified that no judicial or departmental proceeding are being contemplated / pending against him / her similarly no vigilance case is being contemplated/pending against him/her. It is also certified that recommendee has not been given any Major Penalty/Minor penalty in the last Five year.

2. It is also certified that the character and antecedents (of the proposed awardee) have been duly verified and nothing adverse reported against him/her.

**Name:-**
Desiganation:- Addl. Commissioner of Police
…………. Mumbai
Contact No :- 022-
Date :- / /2026